ई-मेल - ddaqc5@rediffmail.com.

जा.क्र./राकृवियो/गुनि-५/कृ.यां.प्र.२०१७-१८/ ४०३ /२०१७
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११ ००१.
दिनांक : ९ /११/२०१७.

**प्रति,**

**१) विभागीय कृषि सहसंचालक, --------------------(सर्व)**

**२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, ----------------(सर्व)**

**विषय - "उन्नत शेती - समृध्द शेतकरी" मोहिमेंतर्गत प्रचलीत योजनांमधील कृषि यांत्रिकीकरणाच्या अंमलबजावणी बाबत अतिरीक्त मार्गदर्शक सुचनांनुसार कार्यवाही करणेबाबत ...**

**संदर्भ :** १) शासन निर्णय क्र. ०३१७/प्र.क्र.१८/राकृवियो कक्ष, दि.१३ एप्रील, २०१७
२) मार्गदर्शक सुचना पत्र जा.क्र.उ.शे.स.शे./कृषि. यांत्रि/१७-१८/१८४/१७, दि.०२/०६/२०१७
३) शासन पुरकपत्र क्र.राकृवि-०३१७/प्र.क्र.१८/राकृवियो कक्ष, दि.२८ सप्टेंबर, २०१७
४) आयुक्तालयाचे पत्र जा.क्र./राकृवियो/गुनि-५/कृ.यां.प्र.२०१७-१८/३३९/२०१७,दि.०३/१०/२०१७
५) शासन निर्णय क्र. ०३१७/प्र.क्र.१८/राकृवियो कक्ष, दि.३१ ऑक्टोंबर, २०१७

सन २०१७-१८ पासुन खरीप व रब्बी हंगामात 'उन्नत शेती-समृध्द शेतकरी' ही मोहीम राबवायची आहे. सदर मोहीमेंतर्गत कृषि यांत्रिकीकरणाच्या अंमलबजावणी बाबत सविस्तर मार्गदर्शक सुचना शासन निर्णय दि.१३ एप्रिल २०१७ अन्वये निर्गमीत करण्यात आल्या आहेत. तसेच सदर मोहिमेची अंमलबजावणी करताना अवलंबवायच्या सविस्तर कार्यपध्दती बाबत आयुक्तालयाच्या मार्गदर्शक सुचना दि. ०२/०६/२०१७ अन्वये निर्गमीत करण्यात आल्या आहेत.

संदर्भिय शासन पुरकपत्र दि. २८ सप्टेंबर २०१७ अन्वये 'उन्नत शेती-समृध्द शेतकरी' मोहीमेंतर्गत यांत्रिकीकरण कार्यक्रमाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने अतिरीक्त सुचना निर्गमीत केल्या आहेत. त्याबाबत दि.३/१०/२०१७ रोजीचे पत्रान्वये आपणास अवगत करण्यात आले आहे.

संदर्भिय शासन निर्णय दि.३१ ऑक्टोंबर, २०१७ अन्वये 'उन्नत शेती - समृध्द शेतकरी' मोहिमेंतर्गत प्रचलीत योजनांमधील कृषि यांत्रिकीकरणाच्या अंमलबजावणी बाबत अतिरीक्त मार्गदर्शक सुचना निर्गमीत करण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयाची प्रत सोबत सहपत्रीत केली आहे. 'उन्नत शेती - समृध्द शेतकरी' मोहिमेंतर्गत प्रचलीत योजनांमधील कृषि यांत्रिकीकरण कार्यक्रमाची अंमलबजावणी करताना सदर मार्गदर्शक सुचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

**सोबत - शासन निर्णयाची प्रत**

**कृषि उपसंचालक (कि.ना. व औ.)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**

"उन्नत शेती - समृद्ध शेतकरी" मोहीमेंतर्गत प्रचलित योजनांमधील कृषि यांत्रिकीकरणाच्या कार्यक्रम अंमलबजावणीबाबत अतिरिक्त मार्गदर्शक सूचना

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्र.राकृवि-०३१७/प्र. क्र. १८ / राकृवियो कक्ष,**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२,
दिनांक : ३१ ऑक्टोंबर, २०१७

वाचा:

१. कृषि व पदुम विभागाचा शा.नि. क्र.०३१७/प्र. क्र.१८/राकृवियो कक्ष, दि.१३.०४.२०१७
२. कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र. जा.क्र. अ.शे.स.शे./कृषि. यांत्रि/१७-१८/१८४/१७, दि. २/०६/२०१७
३. कृषि व पदुम विभागाचा शा.नि. क्र.०३१७/प्र. क्र.१८/राकृवियो कक्ष,दि. २९.०७.२०१७
४. कृषि व पदुम विभागाचा शासन पूरकपत्र क्र.राकृवि- ०३१७/प्र. क्र.१८/राकृवियो कक्ष, दि.२८.०९.२०१७

**प्रस्तावना:**

चालू वर्षापासून "उन्नत शेती - समृद्ध शेतकरी" अभियानांतर्गत कृषि विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांतर्गत कृषि यांत्रिकीकरणाचा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना संदर्भांकित पत्र दि. ०२/०६/२०१७ अन्वये विहित केलेल्या आहेत. त्यानुसार यांत्रिकीकरणाकरिता सर्व योजनांच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या निधीपैकी ४० % ट्रॅक्टर खरेदीस अनुदान म्हणून व ६० % निधी कृषि यंत्र व औजारांच्या खरेदीस अनुदान म्हणून विनियोगात आणण्यास मान्यता देण्यात आली होती.

त्याचप्रमाणे क्षेत्रीय स्तरावरील काही तालुक्यांमधील प्रत्यक्ष परिस्थिती लक्षात घेऊन, ट्रॅक्टरसाठी उपलब्ध करुन दिलेला निधी मागणी अभावी शिल्लक रहात असल्यास, सदर निधी संबंधित तालुक्यात कृषि यंत्र व औजरांसाठी विनियोगात आणण्यास यापूर्वीच संदर्भांकित शासन पूरक पत्र दि.२८.०९.२०१७ अन्वये अनुमती देण्यात आलेली आहे.

राज्यात यांत्रिकिकरणासाठी माहे एप्रिल, २०१७ मध्ये प्रसिध्द केलेल्या जाहिरातीव्दारे सुमारे १.२० लाख अर्ज प्राप्त झाले आहेत व त्यापैकी ट्रॅक्टरकरिता मोठया प्रमाणात शेतकऱ्यांची मागणी असल्याचे निदर्शनास आले आहे. त्याचप्रमाणे काही तालुक्यांमध्ये यंत्र व औजारांकरिता उपलब्ध करुन दिलेला निधीपैकी लाभार्थ्यांच्या प्रतिसादा अभावी अखर्चित राहणारा निधी ट्रॅक्टरकरिता उपलब्ध करुन देण्याची मागणी क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून योजनेच्या आढावा बैठकीदरम्यान होत आहे. या पार्श्वभूमीवर संदर्भांकित दि. १३/०४/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदींमध्ये आवश्यक बदल करण्याबाबत शासन पुढील निर्णय घेत आहे -

**शासन निर्णय:**

१. ज्या तालुक्यांमध्ये कृषि यंत्र व औजारांसाठी प्राप्त झालेल्या सर्व अर्जदारांना निवडपत्र व पूर्वसंमती दिल्यानंतरही यंत्र व औजारांसाठी प्राप्त झालेला निधी पूर्णपणे खर्ची पडत नसेल तर सदर शिल्लक निधी

त्याच तालुक्यामध्ये ट्रॅक्टर खरेदी करिता अनुदान देण्यासाठी विनियोगात आणता येईल. त्याकरिता सदर शिल्लक अनुदानाच्या मर्यादेत चालू वर्षी ट्रॅक्टर खरेदीकरिता प्राप्त झालेल्या अर्जदारांना योजनेकरिता विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार अनुदान अदा करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

२. ज्या तालुक्यांमध्ये यंत्र व औजारांसाठी प्राप्त झालेल्या अर्जांपैकी काही अर्जदार शिल्लक आहेत तथापि, यापूर्वी पूर्वसंमती दिलेल्या अर्जदारांनी अनुदानासाठी विहित कालावधीत अनुदानासाठी प्रस्ताव सादर केला नसल्यास, अशा अर्जदारांना प्रस्ताव सादर करण्याची ७ दिवसांची मुदत द्यावी व सदर मर्यादेत त्यांच्याकडून प्रस्ताव प्राप्त न झाल्यास त्यांची पूर्व संमती रद्द करुन निवड यादीतील / प्रतिक्षा यादीतील पुढील पात्र सर्व शेतकऱ्यांना दि.१५ नोव्हेंबर, २०१७ पर्यंत पूर्व संमती प्रदान करण्यात यावी. या शेतकऱ्यांकडूनही दि.३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत अनुदान वितरणाबाबत प्रस्ताव प्राप्त न झाल्यास संबंधित शेतकऱ्यांच्या पूर्वसंमती रद्द कराव्यात. ही कार्यवाही झाल्यानंतर कृषि यंत्र व औजारांसाठी निधी शिल्लक रहात असल्यास सदर निधी ट्रॅक्टर खरेदीकरिता त्याच तालुक्यातील प्रतिक्षा यादीतील शेतकऱ्यांना अनुदान अदा करण्याकामी विनियोगात आणावा.

३. ज्या तालुक्यांमध्ये यंत्र व औजारांचा निधी शिल्लक राहणार आहे तथापि, ट्रॅक्टरकरिता पुरेसे लाभार्थी उपलब्ध नसतील तर सदर निधीच्या विनियोगासाठी पुनःश्च ट्रॅक्टर तसेच यंत्र व औजारे खरेदीकरिता जाहिरात प्रसिध्द करुन निधी खर्ची टाकण्याची कार्यवाही योजनेच्या मुळ मार्गदर्शक सुचनेनुसार करावी.

४. अशाप्रकारे, परिच्छेद क्र.१ ते ३ मध्ये विहित केलेल्या प्रक्रियेव्दारे कृषि यंत्र व औजारांसाठी शिल्लक राहणारा निधी ट्रॅक्टरकरिता विनियोगात आणावा तथापि, सदर कार्यवाही संबंधित तालुक्यांतर्गत करण्यात यावी आणि सदर प्रयत्नांती देखिल तालुक्याचा निधी अखर्चित रहात असल्यास शिल्लक निधी यथास्थिती जिल्हयांतर्गत/विभागांतर्गत व राज्यस्तरावर उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही अभियानाच्या मुळ मार्गदर्शक सूचनेनुसार करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०३११७२१३७९६०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shrikant Chandrakant Andge

Digitally signed by Shrikant Chandrakant Andge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1bee0fffaa62085c34db6bfd8c,
serialNumber=d8d9626c9e038380cd235c048f20d7ce74cffd3a95f2ac3c192e9c991f358271, cn=Shrikant Chandrakant Andge
Date: 2017.10.31 17:11:28 +05'30'

**(श्रीकांत चं. आंडगे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मुख्य मंत्री, मंत्रालय, मुंबई

२. मा. मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई
३. मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
४. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
५. अ.मु.स. (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
६. अ.मु.स. (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
७. प्र. स. (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
८. विभागीय आयुक्त (सर्व)
९. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे
१०. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी वनस्पती मंडळ, पुणे
११. कुलगुरु (सर्व कृषि विद्यापीठ), महाराष्ट्र राज्य
१२. व्यवस्थापकीय संचालक, महाबीज, अकोला.
१३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई.
१४. महासंचालक, महाराष्ट्र राज्य कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे
१५. जिल्हाधिकारी (सर्व)
१६. मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व जिल्हा परिषद)
१७. सर्व उप सचिव (कृषि), कृषि, पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८. कृषि संचालक (सर्व) / कृषि सह संचालक (सर्व), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१९. विभागीय कृषि सह संचालक (सर्व)
२०. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)
२१. प्रकल्प संचालक (आत्मा), (सर्व)
२२. माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
२३. महालेखापाल, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई
२४. महालेखापाल, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर
२५. निवड नस्ती (कार्यासन राकृवियो).

जा.क्र./राकृवियो/उशेसशे/अनु.वा/२०१७-१८/गुनि-५/ ४५० /२०१७
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे– ०१
दिनांक : ३० /११/२०१७

प्रति,

**१. विभागीय कृषि सहसंचालक .................. (सर्व)**

**२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी .......... (सर्व)**

**विषय : कृषि यांत्रिकीकरण यंत्र/औजारांना जीएसटीची रक्कम वगळून अनुदान अदा करणेबाबत ...**

**संदर्भ :** शासन पत्र क्र. राकृवि-१११७/प्र.क्र.२६/१४अे, दि. २३/११/२०१७

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय शासन पत्रान्वये "उन्नत शेती - समृध्द शेतकरी" मोहिमेंतर्गत, कृषि यांत्रिकीकरण अंतर्गत ट्रॅक्टर व इतर औजारांच्या अनुदानाची परिगणना करण्यासाठी जी.एस.टी. वगळून असणारी किंमत विचारात घेण्यात यावी. अशाप्रकारे, यंत्रांच्या कर रहीत रकमेवर देय असणा-या अनुदानाच्या रकमेची परिगणना करावी आणि सदर परिगणिक अनुदानाची रक्कम अथवा संबंधीत यंत्राकरीता अनुदानाची विहीत कमाल रक्कम यापैकी जी कमी असेल तेवढया रकमेचे अनुदान लाभार्थ्यांना अदा करण्यात यावे असे कळविले आहे.

यास्तव "उन्नत शेती - समृध्द शेतकरी" मोहिमेंतर्गत समाविष्ट सर्व योजनांमध्ये अनुदानाची परीगणना उपरोक्त नमुद केल्यानुसार करण्यात यावी.

**(एम. एस. घोलप)**
**कृषि संचालक (नि. व गु. नि.)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**

**प्रत :**

**कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण)** कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-०५ — यांना माहितीस्तव

जा.क्र./राकृवियो/उशेसशे/अनु.वा/२०१७-१८/गुनि-५/ ४५० /२०१७
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे– ०१
दिनांक : ३० /११/२०१७

प्रति,

**१. विभागीय कृषि सहसंचालक .................. (सर्व)**

**२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी .......... (सर्व)**

**विषय : कृषि यांत्रिकीकरण यंत्र/औजारांना जीएसटीची रक्कम वगळून अनुदान अदा करणेबाबत ...**

**संदर्भ :** शासन पत्र क्र. राकृवि-१११७/प्र.क्र.२६/१४अे, दि. २३/११/२०१७

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय शासन पत्रान्वये "उन्नत शेती - समृध्द शेतकरी" मोहिमेंतर्गत, कृषि यांत्रिकीकरण अंतर्गत ट्रॅक्टर व इतर औजारांच्या अनुदानाची परिगणना करण्यासाठी जी.एस.टी. वगळून असणारी किंमत विचारात घेण्यात यावी. अशाप्रकारे, यंत्रांच्या कर रहीत रकमेवर देय असणा-या अनुदानाच्या रकमेची परिगणना करावी आणि सदर परिगणिक अनुदानाची रक्कम अथवा संबंधीत यंत्राकरीता अनुदानाची विहीत कमाल रक्कम यापैकी जी कमी असेल तेवढया रकमेचे अनुदान लाभार्थ्यांना अदा करण्यात यावे असे कळविले आहे.

यास्तव "उन्नत शेती - समृध्द शेतकरी" मोहिमेंतर्गत समाविष्ट सर्व योजनांमध्ये अनुदानाची परीगणना उपरोक्त नमुद केल्यानुसार करण्यात यावी.

**(एम. एस. घोलप)**
**कृषि संचालक (नि. व गु. नि.)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**

**प्रत :**

**कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण)** कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-०५ — यांना माहितीस्तव

जा.क्र./रा.कृ.वि.यो./उशेसशे/२०१७-१८/ गुनि-५/ २५७ /२०१७
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे– ०१
दिनांक : ०७ /०८/२०१७

प्रति,

१. **विभागीय कृषि सहसंचालक ..........(सर्व)**

२. **जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी ........ (सर्व)**

**विषय : "उन्नत शेती -समृध्द शेतकरी" मोहिमेंतर्गत प्रचलीत योजनांमधील घटकाची अर्थसंकल्पीय तरतुदीच्या मर्यादेत १०० टक्के अंमलबजावणी करणेबाबत ....**

**संदर्भ** शासन निर्णय क्र. राकृवि-०३१७/प्र.क्र.१८/राकृवियो कक्ष, दि. २९/७/२०१७

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयान्वये उन्नत शेती - समृध्द शेतकरी मोहिमेंतर्गत, प्रचलीत योजनांमधील घटकांची अंमलबजावणी करताना करावयाच्या कार्यवाहीबाबत सुचना निर्गमीत कण्यात आल्या आहेत. सदरहू शासन निर्णयाची प्रत सोबत सहपत्रीत केली आहे.

शासन निर्णय दिनांक २९/७/२०१७ मधील मुद्दा क्र. १ नुसार, कृषि विभागामार्फत राबविण्यात येणा-या सर्व केंद्र पुरस्कृत योजनांची अंमलबजावणी करताना लाभार्थ्यांची निवड प्रक्रिया विहित पध्दतीने राबवून त्या त्या वर्षाच्या वार्षिक कृती आराखडयामध्ये विहीत केलेल्या आर्थिक लक्षांकानुसार लाभार्थी शेतक-यांना वर्षाच्या सुरुवातीलाच पूर्वसंमती प्रदान करण्यात यावी.

सर्व प्रचलीत योजनेतील यांत्रिकीकरण घटकांच्या / बाबींच्या अंमलबजावणी दरम्यान केंद्र /राज्य शासनाने विहीत केलेल्या प्रमाणात अनुसूचीत जाती /अनुसूचित जमाती व सर्वसाधारण प्रवर्ग तसेच अल्प अत्यल्पभूधारक शेतकरी व महिला लाभार्थी शेतक-यांचे विहीत केलेले प्रमाण राखून योजनांची अंमलबजावणी करण्यात यावी.

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयातील नमुद सुचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

**सोबत : वरीलप्रमाणे**

(अशोक लोखंडे)
**कृषि संचालक (नि. व गुनि.)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**

“उन्नत शेती - समृद्ध शेतकरी” मोहीमेंतर्गत प्रचलित योजनांमधील घटकांची अर्थसंकल्पीय तरतूदीच्या मर्यादेत १००% अंमलबजावणी करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्र. ०३१७/प्र. क्र. १८ / राकृवियो कक्ष,**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२,
दिनांक : २९ जुलै, २०१७

**वाचा:** कृषि व पदुम विभागाचा शा.नि. क्र. ०३१७/प्र. क्र. १८ / राकृवियो कक्ष, दि. १३/०४/२०१७

**प्रस्तावना:**

चालू वर्षापासून खरीप व रबी हंगामात “उन्नत शेती - समृद्ध शेतकरी” मोहीम राबविण्याचा राज्य शासनाने संदर्भांकित शासन निर्णय दि. १३/०४/२०१७ अन्वये निर्णय घेतलेला आहे. या मोहिमेद्वारे कृषि विभागाच्या प्रचलित योजनांच्या अंमलबजावणीत अधिक सुटसुटीतपणा व सुसूत्रता आणून योजना पारदर्शकरित्या व अधिक प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत त्याचप्रमाणे, आधुनिक कृषि तंत्रज्ञान राज्यातील सर्व शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यात येत आहेत.

कृषि विभागांतर्गत प्रामुख्याने केंद्र पुरस्कृत योजना राबविण्यात येत असून काही राज्य पुरस्कृत योजना राबविण्यात येत आहेत. प्रत्येक वर्षाच्या सुरुवातीलाच केंद्र व राज्य शासनाने त्या-त्या योजनेसाठी मंजूर केलेल्या आर्थिक नियतव्ययाच्या मर्यादेत राज्य शासन वार्षिक कृती आराखडा तयार करते. सर्व केंद्र पुरस्कृत योजनांचा वार्षिक कृती आराखडा केंद्र शासनास सादर करण्यात येतो आणि केंद्र शासनाच्या मान्यतेनंतर या योजनांची खरीप व रब्बी हंगामात अंमलबजावणी करण्यात येते. त्याचप्रमाणे, राज्य शासन पुरस्कृत योजनांचा आराखडा राज्य पातळीवर अंतीम करुन त्या योजनांची वर्षभरात अंमलबजावणी करण्यात येते. अशाप्रकारे, प्रत्येक वर्षी त्या - त्या योजनेसाठी मंजूर आर्थिक नियतव्ययाच्या मर्यादेत वार्षिक कृती आराखडयाच्या अंमलबजावणीसाठी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात येते.

राज्याच्या कृषि क्षेत्राचे अवलोकन केले असता लागवडीखालील एकूण क्षेत्रापैकी जवळपास दोन तृत्यांश क्षेत्र खरीप हंगामामध्ये आणि एक तृत्यांश क्षेत्र रब्बी हंगामात लागवडीखाली असते तथापि, सर्व केंद्र पुरस्कृत योजनांमध्ये वार्षिक कृती आराखडयाच्या एकूण रकमेपैकी पहिल्या हफ्त्यात ५०% निधी माहे मे-जून महिन्यात व उर्वरीत ५०% निधी माहे, नोव्हेंबर-डिसेंबर दरम्यान केंद्र शासनाकडून राज्यास वितरीत होतो. सबब, सदर योजनांतर्गत पहिल्या हफ्त्यात उपलब्ध होणाऱ्या ५०% निधीच्या मर्यादेत विविध घटकांकरिता कृषि विभागामार्फत शेतकऱ्यांना पूर्वसंमती देताना प्रदान करण्यात येत होत्या व उर्वरीत ५०% कामांना दुसऱ्या हफ्त्यातील निधी प्राप्त झाल्यानंतर पूर्वसंमती प्रदान करण्यात येत होत्या, जेणेकरुन

शेतकऱ्यांना पूर्वसंमती प्रदान करुन निधी अभावी त्यांचे प्रस्ताव प्रलंबित राहू नयेत तसेच, मूळ अर्थसंकल्पीय तरतूदीत कपात झाल्यास शासनावर आर्थिक दायित्व निर्माण होऊ नये.

वास्तविकत: राज्यात खरीप हंगामात लागवडीखालील क्षेत्र जास्त असल्याने या हंगामात योजनांतर्गत विविध घटकांची / कामांची अंमलबजावणी मोठया प्रमाणात होत असते. खरीप हंगामात प्राप्त होणारा अपूरा निधी व माहे सप्टेंबर-ऑक्टोंबरमध्ये रब्बी हंगाम सुरु होऊन देखिल दुसऱ्या हफ्त्यातील ५०% निधी उशिरा प्राप्त होत असल्याने वर्ष अखेरीस काही योजनांचा निधी अखर्चित रहात आहे. सबब, केंद्र व राज्य पुरस्कृत योजनांमध्ये विविध घटकांच्या / कामांच्या अंमलबजावणी करिता वार्षिक कृती आराखडयामध्ये विहीत केलेल्या भौतीक व आर्थिक लक्षांकाऐवढया पूर्वसंमती प्रदान करण्याबाबत क्षेत्रिय यंत्रणेस सूचित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती, त्याबाबत शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय:**

१. सन २०१७-१८ पासून दर वर्षी कृषि विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व केंद्र पुरस्कृत योजनांमध्ये लाभार्थ्यांची निवड प्रक्रिया विहीत पद्धतीने राबवून त्या-त्या वर्षीच्या वार्षिक कृती आराखडयामध्ये प्रत्येक हंगामातील पिकांसाठी विहीत केलेल्या भौतीक व आर्थिक लक्षांकाऐवढया लाभार्थी शेतकऱ्यांना वर्षाच्या सुरुवातीलाच पूर्वसंमती प्रदान करण्यात याव्यात.

२. अपवादात्मक परिस्थितीत, केंद्र पुरस्कृत योजनांच्या अर्थसंकल्पीय तरतूदीमध्ये थोडयाफार प्रमाणात कपात झाल्यास, चालू वर्षाचे प्रलंबित आर्थिक दायित्व पुढील आर्थिक वर्षाच्या तरतूदीतून अदा करण्यास केंद्र शासन नेहमीच संमती देत आहे सबब, अशा परिस्थितीत निर्माण होणारे आर्थिक दायित्व पुढील आर्थिक वर्षाच्या तरतूदीतून प्राथम्याने भागविण्यात यावे.

३. राज्य पुरस्कृत योजनांच्या बाबतीत वित्त विभागामार्फत वर्षाच्या सुरुवातीस सर्वसाधारणत: ८०% निधी वितरीत करण्यात येतो. सबब, त्या-त्या योजनेच्या वार्षिक कृती आराखडयामध्ये प्रत्येक हंगामातील पिकांसाठी विहीत केलेल्या भौतीक व आर्थिक लक्षांकाच्या ८०% मर्यादेपर्यंत लाभार्थी शेतकऱ्यांना वर्षाच्या सुरुवातीलाच पूर्वसंमती प्रदान करण्यात याव्यात.

४. अपवादात्मक परिस्थितीत, राज्य पुरस्कृत योजनांच्या अर्थसंकल्पीय तरतूदीमध्ये थोडयाफार प्रमाणात कपात झाल्यास, चालू वर्षाचे प्रलंबित आर्थिक दायित्व पुढील आर्थिक वर्षाच्या तरतूदीतून प्राथम्याने अदा करण्यात यावे.

५. सदर शासन निर्णय स्थायी स्वरुपाचा असून उपरोक्त निर्देशाप्रमाणे प्रति वर्ष सर्व प्रचलित योजनेतील घटकांच्या / बाबींच्या अंमलबजावणी दरम्यान त्या-त्या योजनेमध्ये केंद्र / राज्य शासनाने विहित केलेल्या प्रमाणात अनुसूचित जाती व जमाती, अत्यल्प व अल्प भूधारक

शेतकरी, महिला लाभार्थी शेतकऱ्यांचे विहित केलेले प्रमाण राखून सर्व केंद्र व राज्य पुरस्कृत योजनांची अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०७२९१८३९३७०२०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shrikant Chandrakant Andge

Digitally signed by Shrikant Chandrakant Andge
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1bee0ffaa62085c34db6bfd8c, cn=Shrikant Chandrakant Andge
Date: 2017.07.29 18:49:17 +05'30'

**( श्रीकांत चं. आंडगे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मुख्य मंत्री, मंत्रालय, मुंबई
२. मा. मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई
३. मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
४. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
५. अ.मु.स. (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
६. अ.मु.स. (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
७. प्र. स. (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
८. प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई
९. विभागीय आयुक्त (सर्व)
१०. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे
११. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी वनस्पती मंडळ, पुणे
१२. कुलगुरु (सर्व कृषि विद्यापीठ), महाराष्ट्र राज्य
१३. व्यवस्थापकीय संचालक, महाबीज, अकोला.
१४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई.
१५. महासंचालक, महाराष्ट्र राज्य कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे
१६. जिल्हाधिकारी (सर्व)
१७. मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व जिल्हा परिषद)
१८. सर्व उप सचिव (कृषि), कृषि, पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९. कृषि संचालक (सर्व) / कृषि सह संचालक (सर्व), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२०. विभागीय कृषि सह संचालक (सर्व)
२१. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)
२२. प्रकल्प संचालक (आत्मा), (सर्व)
२३. माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
२४. महालेखापाल, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई
२५. महालेखापाल, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर
२६. निवड नस्ती (कार्यासन राकृवियो).